# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in  E-mail – account@pcmcindia.gov.in


जावक.क्र.लेखा/२९/कावि/८८/२०२४ दिनांक :- १०/०६/२०२४

## परिपत्रक

विषय :- अंदाजपत्रकातील विकास कामांना तरतूद करण्याच्या दक्षतेबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि.१७/०४/२०१५

२) मा.आयुक्त सो यांचेकडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/५६/२०२४ दि.१५/०२/२०२४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करताना भांडवली विभागांकडून अंदाजपत्रकामध्ये नविन विकास कामे अथवा मोठ्या प्रकल्पांचा समावेश करताना नाममात्र ( टोकन) तरतूदी ठेवल्याचे निदर्शनास आले होते. अशा प्रकरणांमुळे मनपाच्या आर्थिक दायीत्वामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असल्याने मा.आयुक्त सो यांचेकडील संदर्भिय परिपत्रकान्वये यापुढे अंदाजपत्रकामध्ये नाममात्र ( टोकन ) तरतूद ठेवलेली नविन विकास कामे अथवा प्रकल्पांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केला जाणार नसल्याचे सुचीत करणेत आले होते.

मनपाच्या आर्थिक नियोजन, आर्थिक औचित्य व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने नविन विकास कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करताना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या तुलनेत तसेच कामाचा कालावधी गृहीत धरून त्या प्रमाणात पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. सुलभ संदर्भाकरीता संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयामधील दिलेल्या मार्गदर्शन सुचनांचे अवलोकन करणेत यावे.

मनपाचे सध्याचे पत मुल्यांकन AA+ असून मनपास भविष्यामध्ये कर्जरोखे उभारण्याची आवश्यकता वाटल्यास चांगले पत मुल्यांकन राखणे अत्यंत आवश्यक आहे. मनपाचे दायीत्वामध्ये वाढ झाल्यास अथवा आर्थिक स्थिती आटोक्यात न राहिल्यास पत मुल्यांकन घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे वित्तीय उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

**सबब, अंदाजपत्रकामध्ये नविन विकास कामे / प्रकल्पांचा समावेश करताना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या किमान २५ % अथवा कामाचा कालावधी गृहीत धरून त्या प्रमाणात टक्केवारीची विभागणी करून ज्या त्या वित्तीय वर्षात तरतूद ठेवणेची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.** सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची गंभीरतेने दखल घ्यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त तथ प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधित विभागप्रमुख